# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 16.09.2025** **वार- मंगळवार**

---

**<u>ड्रोन शो रद्द</u>**

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आज आयोजित केलेला ड्रोन लाईट शो पावसामुळे एक दिवस पुढे ढकलण्यात आला असून तो उद्या रात्री ८ वाजता स.प. महाविद्यालयाच्या मैदानात होणार आहे अशी माहिती मोहोळ यांनी दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या औचित्यानं केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ यांच्यावतीने आज विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं.

**<u>स्वच्छता ही सेवा</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेकडून १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान 'स्वच्छता ही सेवा' अभियान राबविण्यात येणार आहे.

महापालिकेने या अभियानांतर्गत १६ दिवसांच्या कालावधीत विविध नाविन्यपूर्ण, लोकसहभाग वाढवणारे कार्यक्रम आखले असून यामध्ये सार्वजनिक जागांची स्वच्छता आणि जलाशय परिसराची स्वच्छता, सफाई मित्रांसाठी आरोग्य तपासणी, सुरक्षा साधनांचे वितरण आणि जनजागृती कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<u>प्रारूपरचना हरकती</u>**

पुणे महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी बनवलेल्या प्रारूप प्रभाग रचनेवरील हरकती आणि सूचनांचा अहवाल राज्यसरकारच्या नगरविकास विभागाकडे सादर करण्यात आला असून राज्य निवडणूक आयोग ३ ते ६ ऑक्टोबर या कालावधीत अंतिम प्रभाग रचना करणार आहे. पुणे महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी नगरसेवकांची संख्या १६५ असून, ४१ प्रभाग आहेत. त्यापैकी ४० प्रभाग चार सदस्यीय, तर ३८ क्रमांकाचा आंबेगाव-कात्रज प्रभाग पाच सदस्यीय आहे.

**<u>लोकअदालत</u>**

पुण्यात प्रमुख जिल्हा आणि सत्र न्यायाधीश आणि पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष एम.के. महाजन यांच्या मार्गदर्शनखाली  १० ते १३ सप्टेंबर  या कालावधीत येरवडा वाहतूक शाखा इथं लोकअदालत पार पडली. यामध्ये एक कोटीहून अधिक महसूल सरकार दरबारी जमा झाला असून सुमारे पाच ते सहा हजार प्रलंबित खटले निकाली काढण्यात आले असल्याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव सोनल पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

**<u>डबलडेकर चाचणी</u>**

पुणे महानगर परिवहन महामंडळ, पुण्यात लवकरच डबल डेकर बस सेवा उपलब्ध करून देणार असून आज कात्रज डेपो परिसरात या बसची चाचणी करण्यात आली. 85 प्रवाशांची क्षमता असलेल्या या दुमजली बस मध्ये साठ प्रवासी बसून तर 25 प्रवासी उभे राहून प्रवास करू शकतात. पहिल्या टप्प्यात संपूर्ण वातानुकूलित आणि विजेच्या बॅटरीवर चालणाऱ्या दहा डबल डेकर बस पीएमपीच्या ताफ्यात दाखल होणार आहेत.

**<u>खत पुरवठा</u>**

यंदाच्या रब्बी हंगामात म्हणजेच ऑक्टोबर २०२५ ते मार्च २०२६ दरम्यान पुणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना २ लाख ६ हजार ६००टन खतांचा पुरवठा होणार असून, यामध्ये युरिया, डीएपी, एमओपी, एसएसपी आणि एनपीके यांसारख्या खतांचा यात समावेश आहे. ई-पॉस मशिनद्वारे पारदर्शक वितरण सुनिश्चित करण्यात येणार असून, शेतकऱ्यांना वेळेवर आणि दर्जेदार खत मिळेल, जिल्हा कृषी विभागाने रब्बी हंगामासाठी सविस्तर नियोजन केले आहे अशी माहिती पुणे जिल्हा कृषी अधीक्षक संजय काचोळे यांनी दिली.

**<u>एसटी अधिकारी कारवाई</u>**

जबाबदारी सक्षमपणे न पाळणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई न करता त्यांना निलंबनानंतर पुन्हा त्याच जागेवर नियुक्ती देणे यासारख्या गंभीर चुका करणाऱ्या अधिकाऱ्यांची यापुढे गय केली जाणार नाही. अशा अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. काल पुणे दौऱ्यावर असताना त्यांनी  अचानकपणे स्वारगेट बसस्थानकाला भेट दिली. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

यंदाच्या फेब्रुवारी महिन्यात स्वारगेट बसस्थानकावर घडलेल्या दुर्दैवी घटनेत दोषी अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी लावण्यात आली होती. त्यांची बदली अन्यत्र करणं गरजेचं होतं परंतु पुन्हा तिथेच त्यांची नियुक्ती करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर सरनाईक बोलत होते. संबंधित प्रादेशिक व्यवस्थापकांच्यावर कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येणार असल्याचं सरनाईक यांनी यावेळी सांगितलं.

**छापे**

पुणे शहरातील नामांकित बांधकाम व्यावसायिकांच्या कार्यालयांवर आणि घरांवर प्राप्तिकर विभागाने छापे टाकले आहेत. या कारवाईत कोहिनूर ग्रुपचे प्रमुख कृष्णकुमार गोयल यांच्या सेनापती बापट रस्त्यावरील आयसीसी टॉवरमधील कार्यालयात आणि सिंध सोसायटीतील घरी छापा टाकण्यात आला. तसेच मित्तल ग्रुपच्या बंडगार्डन भागातील कार्यालयावर देखील ही कारवाई करण्यात आली असल्याचं आमच्या वार्ताहरानं दिलेल्या बातमीत म्हटलं आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज दुपारी जोरदार पावसानं हजेरी लावली. उद्याही आकाश सामन्यात: ढगाळ राहून मेघगर्जना आणि वीजांसह  हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणेकेंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये,नमस्कार.**